# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य
## जुनी मध्यवर्ती इमारत ,तळमजला पुणे

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई -: मेल आयडी-sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष -७/निवडणुक प्रक्रीया घोषणा/१०३७ /२०१६
दिनांक : २०/ ०२ /२०१६

वाचावे :

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४
३. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था या कार्यालयाचे दि.५/१२/२०१४ रोजीचे पत्र
४ इकडील जा.क्र. रासनिप्रा/१०४८/२०१४ दि.१२/१२/२०१४
५ सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था या कार्यालयाचे जा.क्र.अर्थ/वसा/जिमसबँ/निवडणूक/१५ दि.१७/१/२०१५ रोजीचे पत्र
६ इकडील जा.क्र./रासनिप्रा/कक्ष-७ /प्रअधि/प्रशा/प्रमंडळ/नियुक्त/२८९५ /२०१५ दि.२/३/२०१५

**विषय : प्रशासक नियुक्त केलेल्या सहकारी संस्थांची निवडणुक प्रक्रीया सुरु करणेबाबत**

**प्रस्तावना-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब चे तरतुदी अन्वये, सहकारी संस्थेच्या सर्व निवडणुका घेण्यासाठी व त्यासाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण हे राज्य शासनाने गठीत केलेल्या " राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास " अधिकार प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, राज्य शासनाने सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी उक्त अधिनियमान्वये तयार केलेले व दि.११/०९/२०१४ रोजी अधिसुचीत केलेले महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ हे अंमलात आले आहेत. आणि,

ज्या अर्थी, उक्त नमुद नियमान्वये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी नेमणुकीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१०)अन्वये मावळत्या समितीच्या सदस्यांचा पदावधी संपल्यावर तात्काळ नव्याने निवडून आलेल्या समितीच्या सदस्यांना पदग्रहण करणे शक्य व्हावे म्हणून विदयमान समितीची मुदत संपण्यापूर्वी समितीची निवडणुक घेणे अनिवार्य आहे, अशी तरतुद आहे .आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) , ७८(अ) व ११० अ या कलमांखाली निबंधकामार्फत संस्थेवर प्राधिकृत अधिकारी /प्रशासक किंवा प्रशासक मंडळाची नियुक्ती केली जाते.अशा नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकारी /प्रशासकांचा कालावधी हा सर्वसाधारणपणे नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिने असतो. सदर ६ महिन्याचा कालावधी संपणेपूर्वी समितीची निवडणूक कलम ७३ कब (१०) चे तरतुदीअन्वये घेणे हे प्रशासक/प्राधिकृत अधिकारी यांचे कर्तव्य आहे.आणि,

ज्याअर्थी,निवडणूक नियम ६ (२) नुसार ज्या सहकारी संस्थांवर प्राधिकृत अधिकारी /प्रशासक यांची नियुक्ती केलेली आहे अशा संस्थांचा मतदार यादी अहर्ता दिनांक निश्चितीचे अधिकार प्राधिकरणास आहेत. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे

कलम ७३ कब (१) चे तरतुदी अन्वये, सहकारी संस्थेच्या सर्व निवडणुका घेण्यासाठी व त्यासाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण हे प्राधिकरणाचे असून ती प्राधिकरणाची जबाबदारी आहे.आणि,

त्या अर्थी, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण अधिनियम व निवडणुक नियमातील नियम ३ (v) अन्वये प्राप्त अधिकारानुसार ज्या सहकारी संस्थांवर अधिनियमातील तरतुदीनुसार प्राधिकृत अधिकारी /प्रशासकांची नियुक्ती केलेली आहे अशा सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-: आदेश :-**

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३ (v) व राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून ज्या सहकारी संस्थांवर अधिनियमातील तरतुदीनुसार प्राधिकृत अधिकारी /प्रशासक/ प्रशासक मंडळ नियुक्त केलेले आहे, अशा सहकारी संस्थांच्या समितीची निवडणुक प्रक्रीया जिल्हा /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निवडणुक नियमातील तरतुदीनूसार तात्काळ प्रभावाने सुरु करावी व अधिनियमातील कलम ७३ कब (१०) चे तरतुदीचे अनुपालन करणेचे निर्देशित करीत आहे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, पुणे यांचे आदेशाने.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे -१ सत्यमेव जयते

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य.पुणे ,

प्रति,

१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व).
२. तालुका / वार्ड सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)

**प्रत माहितीस्तव** - विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**प्रत सस्नेह रवाना** :- १.मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा.संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपुर
४. मा.आयुक्त (दुग्ध विकास), महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई
५. मा.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे